ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१


# 51@51

आम्ही ५१ !

**गोष्ट क्र. १**

**३ जानेवारी २०२१**

***राजीव बसर्गेकर***
***(१९७३)***



" अन्नपूर्णा बेसकॅम्पला गेल्यावर जशी ३६० अंशात सर्वत्र शिखरे दिसतात तसे माझ्या आयुष्यात असे एकच शिखर शोधता येईल असे मला वाटत नाही. चालण्यासाठी पाय दोनच मात्र वाटा असंख्य आहेत.


'एकच तारा समोर आणि पायतळी अंधार' असे माझ्या आयुष्यात कधी नव्हते. जे समोर असेल त्यामध्ये मी चिंब भिजून जात असे.... "



jpp51_51@jnanaprabodhini.org

## प्रशालेत प्रवेश

आठवीमध्ये संध्याकाळच्या प्रबोध वर्गासाठी माझी निवड झालेली होती. मी ९वीमध्ये असताना प्रशाला सुरू झाली पण मी नववीमध्ये शाळेत प्रवेश घेतला नव्हता. मात्र प्रबोध वर्गाला मी प्रशालेच्या तुकडी सोबत बसत असे. आम्हाला त्यावेळी 'साहित्य प्राज्ञ' परीक्षेची तयारी करायची होती. १०वीमध्ये मी आणि माझा मित्र हेमंत पत्की, आम्हीमॉडर्नहायस्कूल मधून प्रशालेत आलो. वर्गात अनेक शाळांमधून आलेली मुले होती. आमच्या जुन्या शाळेतील ९वीमध्ये प्रवेश घेतलेले राजीव पाटील आणि अरविंद परांजपे देखील पुन्हा भेटले. मॉडर्नहायस्कूल मधून नववीत आलेले विकास दोशी आणि मोरेश्वर ओगलेही होते. बाकीसगळ्यांशी सहज ओळखी झाल्या.



१९७३ चा वर्ग

१०वीमध्ये असताना मैदानावर शरदराव सुंकर हे कार्यवाह आणि विसूभाऊ गुर्जर मुख्यशिक्षक होते. त्यावेळी मी पुणे विद्यापीठातून शाळेला सायकलवर यायचो. १०.२० ला सकाळी शाळा भरायची. संध्याकाळी ५.३० ते ७.३० मैदानावर खेळायचे. न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर व्हॉलीबॉल, फुटबॉल खेळणे हा चांगला अनुभव होता. खो-खो मी मैदानावर पहिल्यांदा शिकलो. दहावीमध्ये असतानाची पथक पद्धती आम्ही अकरावीमध्ये गेल्यावर अधिक प्रगल्भ झाली. आमच्या वर्गातील 'पथक प्रमुख' होते. आमच्या बारावीमध्ये, आमचा वर्ग आणि आमच्या नंतरचा म्हणजे गिरीशरावांचा वर्ग एकत्र करून आम्ही HSC परीक्षेला बसलो.

## सहली आणि शिबिरे

दहावीमध्ये वर्गाची सहल राजगडला आणि पथकाची सहल लोहगड-विसापूरला गेली होती. ११वीमध्ये पावसाळी सहलीला प्रत्येक पथकाला कामगिरी सोपवण्यात आली होती. त्यावेळी आमच्या योगी अरविंद पथकाचा प्रमुख विकास दोशी आणि साहाय्यक अनिल भोसले हे होते. आम्ही लोहगड आणि विसापूरच्या मधल्या खिंडीतून उतरून पवना धरणाचे सुरू असलेले काम पाहून यायचे, त्यांच्या कार्यालयात जाऊन धरणाची आणि कामाची माहिती घ्यायची अशी योजना होती. पवना नदीचे वैशिष्ट्य आजही लक्षात आहे की तिला पुढे कालवे नव्हते आणि नदी पुढे वाहत जाते तिथे पाच कोल्हापूर पद्धतीचे म्हणजे पूल असणारे बंधारे आहेत. ह्यासगळ्याची माहिती घेणे, भूगोल–इतिहास समजून घेणे, लोकांना प्रश्न विचारणे आणि सतत चालणे हा अनुभव अविस्मरणीय होता.मला वाचनाची आवड असल्याने शिवचरित्र जवळपास तोंडपाठ केलेले होते. ह्याच परिसरात – तुन्गारण्यात- कारतलब खान आणि रायबाघन यांच्याबरोबर शिवाजी महाराजांची लढाई झालेली होती. तेथील लोकांशी बोलून त्यांचे राहणीमान कसे आहे? ते काय पीक घेतात? भातशेती नंतर दुसरे पीक घेतात का? अशी सगळी माहिती समजून घेता आली. बारावीच्या सुरुवातीला वासंतिक शिबिर होते. त्यामध्ये मी अनेक खात्यांची जबाबदारी घेऊन जोरात

तयारी केलेली होती. शिबिरापूर्वी तयारीसाठी मी प्रबोधिनीतच राहिलो होतो. आण्णा तिथे रहात असत. मोहनराव त्यावेळी कुटुंबियांसोबत बाहेर गेले होते आणि आप्पा त्यावेळी फ्रान्सला गेले होते. शिबिराचे मुख्य विसूभाऊ होते आणि भाई फडके साहाय्यक होते. आम्ही सर्वांनी मिळून तेंव्हा शिबिर घडवले. नियोजन शिकलो, बॉक्सिंग शिकलो, कुस्ती शिकवायला बाळासाहेब लांडगे आले होते, शरदराव सुंकर होते. त्यावेळी आम्हाला सांगितले गेले की, 'बॉक्सिंग आता नंतर शिका, विजय सावंत आणि जयंत सावंतआपले घरचेच आहेत. बाळासाहेब येणार आहेत तर सगळ्यांनी आधी कुस्ती शिका !'

ते शिबिर झाल्यानंतर आण्णा म्हणाले की आपण मे महिन्यामध्ये सर्व प्रबोधिनीची सहल रायगडला नेऊयात. त्यावेळी १६५ विद्यार्थी होते. मी, हेमंत पत्की, विवेक कुलकर्णी, गिरीश बापट आणि अन्य काहीजण असे विद्यार्थ्यांचे पत्ते घेऊन त्यांच्या घरोघरी जाऊन आलो किंवा फोन करून बोलावले, शाळेला सुट्टी लागल्याने काही गावी गेलेले होते. अनेकांच्या पालकांनी प्रशालेची सहल आहे म्हणून मुलांना परगावाहून बोलावून घेतले. ह्या सहलीत गटानुसार सायकलने, पायी चालत, वाहनाने असे जायचे होते. मी पायी जाणाऱ्या गटाचा प्रमुख होतो. आम्ही वेल्ह्यामधून उतरून रायगडला जाणार होतो. ह्या सगळ्या सहलीच्या पूर्वतयारीसाठी मी आणि गिरीशराव आठवडाभर आधी महाडला गेलो. तिथे आपले ग्रंथपाल रामभाऊ हर्डीकर होते. त्यांच्या काही मि त्रांसाठीत्यांनीदिलेल्याचिठ्ठ्या घेऊन छोट्या गटासाठीची सोय करून आलो. आमचे जाताना आरक्षण होते मात्र येताना पंचाईत झाली. ट्रकवाला कुणी आम्हाला पुण्याच्या दिशेला सोडेल का ह्याची चौकशी करत होतो. शेवटी आम्ही स्टँडच्या बाहेरच्या कठड्यावर रात्री दोघेजण झोपलो आणि सकाळी उठून पहिल्या भोर गाडीने पुण्याला आलो. नंतर सहल उत्तम पार पडली. त्यावेळी मला आठवतंय की पायी गट आधी पुण्याला परत पोहोचतो की सायकल गट आधी पोहोचतो अशी शर्यत लागली होती. आम्ही दुपारी दोन वाजता प्रबोधिनीत येऊन आंघोळ करून जे झोपलो ते रात्री ९ वाजता सायकल गट पोहोचला तेंव्हाच उठलो.

**व्रतेन दीक्षामाप्नोति** !!

१२वीमध्ये असताना मी पूर्ण वर्ष प्रबोधिनीमध्ये रहात होतो आणि ६वीच्या वर्गाचा युवक मार्गदर्शक होतो. आम्ही १२वीमध्ये असताना पहिल्यांदा दीक्षाग्रहण संस्कार झाला. त्याच्या उपासनेचा आराखडा तेव्हा आप्पा तयार करत होते. तेव्हा आप्पा परांडेवाड्यातील (आत्ताच्या विनायक भवन नव्या वास्तूच्या जागी होते ते) खोलीत बसायचे आणि आम्हाला म्हणायचे, " चलां राजीव, हेमंता(पत्की)या आता इकडे! उपासनेची तयारी करूयात!" असे बोलवायचे. तेव्हा विनयराव हर्डीकर ह्यांनी त्यांच्या कवितेत म्हटल्याप्रमाणे'उत्तुंग, आर्त, मनभेदी स्वराने गाणे!'असे त्यांचे गाणेअसायचे. आम्हाला मग ते वेगवेगळ्या चालीत म्हणायला सांगायचे. "सत्यमेव जयते नानृतम्, सत्येन पंथा: विततो देवयान:, काया ही पंढरी | आत्मा हा विठ्ठल || नांदतो केवळ ऽऽ अऽऽ अ" असा नीट येईपर्यंत आप्पांनी दहावेळा 'ळ' घोटून घेतला. बारावीला असताना २०० गुणांचे पाच विषय असायचे. आमच्या आधीच्या वर्गाने २०० मार्कांचे हिन्दी निवडले होते. आम्हाला असा शोध लागला की हिन्दी सोडता येते पण त्याऐवजी मशीन ड्रॉइंग निवडायला लागेल. मगगिरीशराव, हेमंत (पत्की), विनय (टेंबे) वगैरे आम्ही मशीन ड्रॉइंग घेऊन मे महिन्यात वर्गात रात्री बसून, एकत्र अभ्यास करून दोन वर्षांचा अभ्यास ७-८ महिन्यात पूर्ण केला.

युवक विभागाच्या नियुक्त्या वर्षारंभाला झाल्या. आपण बाहेर देखील दले सुरू करावीत असा विचार त्यावेळी झाला होता आणि माझी 'नवकार्य प्रतोद' म्हणून नियुक्ती झाली होती. B.Sc.करत असताना मी गरवारे महाविद्यालयातील एका सायन्स प्रकल्प स्पर्धेत भाग घेतला. आप्पांनी कल्पना मांडली होती की 'काँग्रेसगवताचा कागद का नाही करता येणार?' त्यावर काम करून मी कागद बनवला. त्यासाठी मला गरवारे महाविद्यालयात १७५ रुपयाचे पहिले बक्षीस मिळाले होते. असाच शोधनिबंध स्पर्धेत भाग घेतलेला आठवतोय.

## UDCT मधले दिवस

१२वी झाल्यानंतर IIT खरगपूरला मी निवडलो गेलो आणि प्रवेश देखिल घेतला होता. मात्र मला इथेच काम करायचे होते म्हणून मी तो प्रवेश रद्द केला. मी त्यावेळी ठरवले की नेहमीच्या वाटेने जाऊन अभियांत्रिकी करण्यापेक्षा आपण B.Sc.करायचे. मला पॉलिमरमध्ये शिक्षण घ्यावेसे तेव्हाच वाटू लागले होते. B.Sc.च्या शेवटच्या दोन वर्षात मध्ये मोठ्या कष्टाने मित्र मिळवले. अनेकजण दु:खी चेहऱ्याने तिथे आलेले असत आणि मी अभियांत्रिकी सोडून त्यांच्या वर्गात आलेला एक वेडा आहे असेच त्यांना वाटायचे. B.Sc. झाल्यानंतर पॉलिमरचे शिक्षण कुठे नव्हते. त्यावेळी मुंबईला UDCT मध्ये सहा तंत्रज्ञान शाखा आहेत त्यात 'प्लॅस्टिक तंत्रज्ञान' नावाची एक शाखा आहे असे समजले. मी पुणे विद्यापीठात (रसायनशास्त्र –पदार्थविज्ञान-गणित गटात) पहिला आलो होतो त्यामुळे मला पाहिजे तो विषय आणि शाखा निवडता आली. तिथे हॉस्टेलवर भारतभरातून अनेक हुशार विद्यार्थी एकत्र होते. त्यामुळे मला एका मोठ्या प्रबोधिनीमध्ये गेल्यासारखेच वाटत होते. IIT किंवा UDCT ला पाठ्यपुस्तकासारखी असणारी संदर्भ पुस्तके माझ्या भावाकडे आधीच होती त्यामुळे माझी ती B.Sc.करत असतानाच वाचून झाली होती. रसायनशास्त्राचा आणि गणिताचा मूलभूत पाया पक्का असल्याने फायदा झाला.मी त्यातल्या पॉलिमर तंत्रज्ञानात पुढे M.Sc.Tech केले. त्यानंतर माझे मार्गदर्शक मला म्हणाले की, "तू लोकांशी चांगला संवाद साधू शकतोस आणि तुझा अभ्यास दांडगा आहे. तू आता इथेच विद्यार्थ्यांना शिकवायला लाग.आणि Ph.D. साठी अर्ज कर." खरेतर मी पूर्वी शाळेत वक्तृत्व स्पर्धेला गेलो की माझे पाय लटपटायला लागायचे. प्रबोधिनीत आल्यावर मात्र दरवर्षी १ ऑगस्टला वक्तृत्व ठरलेले असायचे. 'टिळक-आगरकर वाद, टिळक राजकरणात आले नसते तर..' अशा विषयांवर सगळयांना बोलायला लावायचे. त्यामुळे तिथे वर्गासमोर किंवा लोकांसमोर बोलायची तयारी झाली. UDCT मध्ये गेल्यावर सेमिनार आणि चर्चासत्रांमध्ये मला वाटले आपली छाप पडायलाच पाहिजे. माझ्या संवाद कौशल्यावर त्यावेळी सर्वजण खुश होते. मी पुढे तीन वर्षं साहाय्यक अध्यापक म्हणून UDCT मध्ये रुजू झालो. Ph.D. संपत आली असतानाच पॉलिमर क्षेत्रात पुनर्वापर करता येईल असे तंत्र शोधायचा माझा विचार होता. त्यावर संशोधन करून मी फ्यूरन रेझिनवर Ph.D. करायची ठरवली. माझे मार्गदर्शक मला म्हणाले की 'अ' भाग तू मी सांगतो तो कर आणि 'ब' भाग तू फ्यूरन रेझिनवर काम कर. तीन वर्षं झाल्यावर मला ते म्हणाले की आता तुझे काम जमा कर. तोपर्यंत मी 'ब' भागाला हात देखील लावला नव्हता. तेव्हा ते म्हणाले, " माझी 'अ' भागात विद्यार्थ्यांकडून जितकी अपेक्षा असते त्याच्या दिडपट काम तू आधीच पूर्ण केले आहेस. त्यावर Ph.D. सहज मिळेल. आणि आता Ph.D. झालास की तू पूर्णवेळ अध्यापक होशील. तेंव्हा 'ब' भाग तुझ्या विद्यार्थ्यांकडून पूर्ण करून घे."

## शेतकरी संघटनेत काम ..

दरम्यानच्या काळात 'शेतकरी आंदोलन' जोरात सुरू होते आणि मी त्यासंदर्भात वाचत होतो. मी पुण्याला आल्यावर मे महिन्याच्या सुट्टीत विनयराव हर्डीकरांच्या बरोबर त्यांच्या पत्रकारितेच्या कामासाठी परभणी आणि नांदेडला गेलो होतो. त्यांच्याबरोबर २-३ वेळा शरद जोशींची भेट झालेली होती. ग्रामीण भाग माहिती होणे, त्याचे कुतुहल असणे, काम करावेसे वाटणे असे माझ्या मनात होतेच. ३१ ऑक्टोबर १९८४ला मालेगाव जवळ टेहरे येथे शरद जोशींचा 'महाराष्ट्र प्रचार यात्रा सांगता मेळावा' होता त्यात सहभागी झालो. मी आजतागायत अनुभवलेली सर्वात जास्त संख्या, ३-४ लाख सहभाग असलेली ती सभा होती. Ph.D. चं काम तसं माझ्या मनासारखं झालेलं नव्हते. मी विचार केला महाराष्ट्रात इतक्या मोठ्ठ्या प्रमाणात जाणीव- जागृती होतेय आणि आपण इथे मुंबईत बसून राहणे योग्य नाही. म्हणून मी तिथून राजीनामा देऊन शेतकरी संघटनेचा पूर्णवेळ कार्यकर्ता बनलो. पुण्यातील एका बैठकीला मी उपस्थित राहिलो आणि त्यात धुळयाला एक तातडीचे अधिवेशन घेण्याचे ठरले. मी मुंबईहून रेल्वे पकडून थेट अनिल गोटेंच्या घरी धुळयाला गेलो. त्यावेळी मी आयुष्यात त्यांना पहिल्यांदाच भेटत होतो. त्यांनी सुद्धा सहज स्वागत करून घरातच रहायला दिले. पुढची साडेतीन वर्षे मी पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम केले, दौरे केले, अनेक परिषदा केल्या. अंबाजोगाईला मी 'ज्वारी उत्पादक परिषद'मध्ये सहभागी झालो. तिथे ज्वारीचा प्रश्न सोडवायला आणि रासायनिक क्षेत्राशी लागेबंधे असल्याने ज्वारीची बियर का नाही करता येणार? असामी विचार केला. मी पुन्हा UDCT मध्ये आलो आणि तिथे फर्मेंटेशन विभाग प्रमुखांना जाऊन भेटलो त्यांनाच विचारले. तेव्हा ते म्हणाले, चल दोघेही ग्रंथशाळेत बसू आणि शोधू.



**ज्वारी उत्पादक परिषदेनंतर**

**दुसऱ्या** दिवशी ते म्हणाले की खूप काही जुने संदर्भ मिळत नाहीयेत, ज्वारीच्या कण्यांची बियर होऊ शकते असा संदर्भ मिळतोय. मी उलट्या बाजूने विचार केला. मी बियर बनवायची पद्धत शोधून काढली आणि त्यावरून बार्लिऐवजीज्वारी का नाही वापरता येणार असा विचार आणि अभ्यास केला. त्य साठीच्या पद्धतीचा विचार केला. त्यासाठी पुन्हा अंबाजोगाईला एका महाविद्यालयात सूक्ष्म जीवशास्त्र शिकवणाऱ्या अध्यापाकाबरोबर चर्चा केली त्याला 'ज्वारीची बियर' ही संकल्पना फार आवडली. त्याने ज्वारीला कोंब फुटतात तेव्हा बार्लीप्रमाणेच आणि तेवढ्या प्रमाणात एन्झाईम तयार होतात का याव्वर प्रयोग केले. ज्वारीची बियर होऊ शकते हे सिद्ध झाले. समर्थ रामदास म्हणत'देव मस्तकी धरावा, अवघा हलकल्लोळ करावा' ह्या उक्तीप्रमाणे मी कुठेही काम करायचो.शरद जोशी आले की त्यांच्याबरोबर कुठे दौरा, कधी दुचाकीवरून ठरेल तिकडे प्रवास किंवा मध्येच महाविद्यालयात येऊन ज्वारीवरचे संशोधन असे सुरू असायचे. त्या संशोधनवर मी एक निबंध लिहिला आणि तो शेतकरी संघटनेच्या साप्ताहिकात छापून आला. तो निबंध वाचून शरद जोशींचा मला फोन आला, त्यांनी मला अनेक शंका विचारल्या आणि विषय

समजून घेतला, आणि लेखाचे स्वत: संपादन केले.त्यावेळी मुंबईला महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रकल्प दिला होता आणि त्यांनी सुंदर बियर तयार केली. तेव्हा विभाग प्रमुख पै ह्यांनी 'पुन्हा UDCT मध्ये येशील तेव्हा चव चाखायला माझ्या कार्यालयात नक्कीये' असे आवर्जून सांगितले. नंतर मी एकदा गेलो तेव्हा पै रजेवर होते. मी त्यांच्या विद्यार्थ्याला विचारले, "माझ्यासाठी बियर ठेवली असेल ती कुठे आहे शोध जरा?" तेव्हा तो म्हणला ती इतकी चवदार झाली होती की आम्ही सर्व संपवून टाकली.

दरम्यानच्या काळात पुण्यात MIT कॉलेज सुरू झाले होते आणि त्यांची पॉलिमर अभियांत्रिकीची पहिली तुकडी तिसऱ्या वर्षात आली होती. त्यांना पॉलिमर विषय शिकवायला मला ओळखीतून बोलवण्यात आले. मला एकदा शेतकरी संघटनेच्या कार्यालयात फोन आला, "मी प्रोफेसर एम. व्ही. जोशी बोलतोय, कॉलेज सुरू केले आहे आणि एक चांगला शिकवणारा हवाय!" तिथे आधी NCL मधले शिकवणारे येत होते पण त्यांना शिकवता येत नव्हते. मी जोशींना म्हणालो की पूर्णवेळ काम करत आहे. त्यावर तूव्हिजिटींगम्हणून शिकवायला ये असे म्हणाले आणि मला एकदा भेटायला बोलावले. मी त्यांना सांगितले की वेळापत्रक वगैरे शक्य नाही. मी दौर्यालवर असेन तेव्हा सुट्टी आणि मी येईन तेव्हा तास. त्यामुळे ज्यावेळी बसर्गेकर येतील त्यादिवशी सर्व तास बसर्गेकरांचे, असे चालायचे. मी काही अभ्यासक्रम तयार केला, प्रयोग बनवले, त्याचे लिखाण केले आणि शिक्षकांना तयार केले. त्यावर्षाच्या शेवटपर्यंत माझी आर्थिक साधने देखील संपत आलेली होती अशावेळी श्री. जोशी म्हणाले आता ही मुले शेवटच्या वर्षाला जातील आणि त्यांचे प्रकल्प देखील आहेत तर तू पूर्णवेळ शिकवायला लाग. मी तिथे १९८७ला पूर्णवेळ रुजू झालो. श्री. अनिल गोटे शेतकरी संघटनेचे अध्यक्ष झाल्यावर मी एका अभ्यास समितीचा सदस्य झालो. त्यावेळी एका दौऱ्यात मी केलेली इतिहासाची मांडणी ऐकून श्री. शरद जोशी म्हणाले, "आम्ही तुला खूप वाया घालवत होतो. मी तुला आता प्रचारक करतो. तू कुठल्याही विषयावर बोलू शकतोस." अशाप्रकारे माझी दोन्ही कामे सुरू होती.

## अनुभवातून वाटचाल

बरेच वर्षं माझ्या डोक्यात माझे अजून शिक्षण सुरू आहे, अजून खरी सुरुवात केलेली नाही अशी भावना होती. मी MIT मध्ये असतानाॲकॅडेमिककौन्सिलचा सर्वात तरुण सदस्य झालो. मी माझी मते तिथे स्पष्टपणे, न कचरता मांडत असे. याचबरोबर इंडियन सोसायटी ऑफ टेक्निकल एज्युकेशन तर्फे ट्रेनर म्हणून माझी निवड झाली. महाराष्ट्राच्या सात/आठ अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात मी सहभागी झालो होतो. 'एकच तारा समोर आणि पायतळी अंधार' असे माझ्या आयुष्यात कधी नव्हते. जे समोर असेल त्यामध्ये मी चिंब भिजून जात असे. मी १९९४-९५ या काळात NCL मध्ये शिकवत असताना Ph.D.चे काम करत होतो. MIT मध्ये असताना श्री. विश्वनाथ कराडांना 'वर्ल्ड फिलॉसॉफिकल कॉंग्रेस' घ्यायची होती. त्यासाठी पुस्तके तयार करण्यात आली आणि त्यावेळी इंग्रजी समजणारी माणसं कमी होती. मी त्या पुस्तकातील पसायदानाच्या इंग्रजी अनुवादावरून कराडांसोबत वादविवाद केलेला आहे. त्यांच्या कक्षात सोनुमामा दांडेकरांची 'सार्थ ज्ञानेश्वरी' हातात घेऊन मी बसलेलो होतो आणि कुठे चुका आहेत ते दाखवत होतो. शेवटी एकमत न झाल्याने मी म्हणालो ह्याच्या खाली 'Translated and Interpreted by Mr. Karad' असे मी छापणार आहे. त्यांना हागौरवच वाटला ही वेगळी गोष्ट!




**औद्योगिक क्षेत्रात व्याख्यान देताना**

ह्या कालावधीत माझे अनेक विद्यार्थी वेगवेगळया पदावर पोहोचले होते. एक विद्यार्थी 'जनरल मोटर्स' मध्ये होता. त्याच्या मॅनेजरला पॉलिमर क्षेत्राची ओळख असणारा माणूस कित्येक मुलाखती घेऊन सुद्धा सापडत नव्हता. माझ्या विद्यार्थ्याने त्याला दबकत-दबकत माझे नाव सुचवले आणि मला बायोडेटा पाठवायची विनंती केली. 'जनरल मोटर्स'चा एक जर्मन माणूस पुण्यात आला होता, त्यानेमाझी भेट घ्यायला मलापुण्यात ब्लू-डायमंड हॉटेलमध्ये बोलावले. आम्ही दोन तास चर्चा करत होतो. तो जे गाड्यांमध्ये पॉलिमर तंत्रज्ञान वापरायचे म्हणत होता त्याचा मी आधीच 'ऑल इंडिया इंडियन प्लॅस्टिक इन्स्टिट्यूट'चा पुणे चॅप्टरचा सेक्रेटरी असल्याने अभ्यास केलेला होता. त्याने मला विनंती केली की एका औपचारिक HR मुलाखतीला यावे लागेल. वयाच्या ४२व्या वर्षी, औद्योगिक क्षेत्राचा काहीही अनुभव नसताना मी तिथे 'डेप्युटी मॅनेजर' म्हणून प्रवेश केला. माझ्यावर कोणी बॉस नव्हता, मी थेट संचालकांना रिपोर्टिंग करत असे. तिथे तंत्रज्ञानात आलेल्या छोट्या-छोट्या समस्या मला चटकन समजत असत. ते वर्षदोनवर्षाचे काम झाल्यावर मला कळवण्यात आले की आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणासाठी मला पाठवणार आहेत. आणि ट्रेनिंग पूर्ण केल्यानंतर मी कदाचित भारतातील पहिला इंजिनिअर डायरेक्टर ऑफ प्रॉडक्ट इंजिनिअरींग असेन. तिथे मला ओपलकोर्सा गाडीवर काम करायला मिळाले. काहीही अनुभव नसताना साधारण तीन वर्षांतच मला आंतरराष्ट्रीय स्तरावर 'चेअरमन्स ऑनर्स' देखील मिळाले. जनरल मोटर्सचे भारतात गाडीचे भाग तयार करायचे असतील तर त्यासाठीचे statement of requirement (SOR) कसे असावे हे ठरवणारा आणि मांडणारा मी मुख्य व्यक्ती होतो. सगळीकडेच असे शिंग मोडून घुसणे चालू होते. त्यादरम्यान माझ्या UDCT मधल्या मित्राने फोन करून रिलायन्समध्ये बोलावून घेतले आणि मी 'डेप्युटी टेक्निकल मॅनेजर' म्हणून काम करू लागलो. मी कधी नोकरी शोधली नाही. नवीन-नवीन लोकं मला बोलवायची आणि मी काम करायला जायचो असेच घडत आले.




**परिषदेमधील सहभाग**

रिलायन्समध्ये polypropylene वर काम करून त्याचे उपयोग अयस्वी का होत माहीत हे मला शोधून काढायचे होते. कसे आणि काय(How आणिWhat) ह्याची उत्तरे सर्वांना माहिती होती मात्र 'असे का?' (Why?) हे मी शोधून काढायच्या मागे असे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञानात सहकार्यासाठी होणाऱ्या परिषदांसाठी मी अमेरिकेत जायचो. रिलायन्समध्येयशस्वी झालेल्या प्रकल्पांत मी होतो म्हणणारे अनेक लोक होते मात्र अपयश आले की त्यात घुसायचो आणि कारण शोधून काढायचो आणि त्यावर उत्तरे शोधायचो.

रिलायन्समुळे प्लॅस्टिकच्या निनिराळया वस्तू बनवणारे भारताच्या कानाकोपर्याशतील जवळपास सर्व प्लांट मला पहायला मिळाले. मी जिथे जाईन तिथे स्वागत असायचं कारण तिथल्या लोकांना गोष्टी कशा करायच्या हे माहीत असायचे पण 'का करायचे?' हे सांगणारा कुणीच नसायचा. कुठल्याही प्रकारे शिकायचा पर्याय सोडायचा नाही आणि कुठलाही पर्याय गौण मानायचा नाही हे प्रबोधिनीमध्ये शिकलो. मला आठवतंय आप्पांनी युवक विभागातील शरदराव सुंकर, विसूभाऊ गुर्जर, सुभाषराव देशपांडे आणि बहुदा बाबुराव चव्हाण ह्यांना एका मॅनेजमेंट कोर्ससाठी पाठवले होते आणि मग ते येऊन आम्हाला रविवारच्या बैठकीमध्ये ही सर्व तंत्रं शिकवत असत. पुढे मी मॅनेजर स्तरावर काम करताना सांगायचो की असे तंत्र वापरा तर माझे सहकारी चकित व्हायचे आणि विचारायचे तू हे कधी शिकलास? आणि हे मी १०वी-११वी मध्येच किंवा युवक विभागात शिकलेलो असायचो. मुख्य गोष्ट अशी आहे की आप्पांनी जे बुद्धीचे पैलू सांगितले आहेत त्यापैकी पहिले सात, "निरीक्षण, आकलन, स्मरण, गूढार्थसंशोधन बुद्धी, कार्यकारण विवेकबुद्धी, प्रत्युत्पन्न मती आणि प्रतिभा... मला असे आत्ताच्या आणि माजी प्रबोधकांना विचारायचे आहे की तुम्हाला हे पैलू लक्षात ठेऊन वापरता येतात का? त्याचा तुम्हाला प्रत्यक्ष उपयोग करता यायला हवा! संदेशग्रहण, संदेश प्रक्षेपण आणि शक्ती प्रदानता असे सर्व पैलू किमान तोंडपाठ करून त्यावर काम करत सतत विकास करत रहायला हवा!" हा प्रबोधिनीचा वारसा आहे. विद्याव्रतापूर्वी चार व्याख्यानात 'बुद्धीचे पैलू' हे व्याख्यान आप्पांनी घेतले होते. पुढे आमच्यावर जबाबदारी होती की युवक कार्यकर्ता म्हणून पुढे ही व्याख्याने आम्ही द्यावीत. सर्व दिशांनी शिकता यायला हवे. 'जानामी सौख्यं नच मे प्रवृती' ह्या प्रमाणे जे आतून चांगले नाही ते नाकारता यायला हवे. अशा सगळया गोष्टी प्रबोधिनीचा वारसा आहे. तो जाणीवपूर्वक पुढे न्यायला हवा! जग ज्याला चांगले म्हणते ते खरेच चांगले आहे का हे प्रबोधकांनी तपासून पहायला हवे. जन्मजात गोष्टींचा अभिमान बाळगणे हा मूर्खपणा आहे. शरद जोशींकडून मी हे शिकलो. देशप्रश्न हे अनेक प्रकारचे आहेत आणि निरनिराळया क्षेत्रात जाऊन खोलवर काम करून ते प्रश्न सोडवता येतात. नेतृत्व नेहमी माणसांचेच करावे असे नाही तर तंत्रज्ञानाचे देखील करावे लागते!

नेतृत्वाची खरी कसोटी ही प्रसंग आल्यावरच लागते. आपल्याकडे म्हटलेले आहे, की नेतृत्वाचे दोन भाग असतात, एक म्हणजे Process leadership आणि दूसरा Content leadership. माझा स्वत:चा पिंड असा आहे, आपल्या आजुबाजूला कोणी Process leadership मध्ये पुढे असेल तर त्याला पुढेच राहू द्यावे आणि Content leadership मध्ये कोणी कमी पडत असेल तर त्याला आपण साहाय्य करावे. मी ट्रेकिंग नेहमी करत असतो. तिथे अनिल मोरे म्हणून आमचा उत्तम नेता (Process leader) आहे. तो मला नेहमी म्हणयाचा, की तू सांगशील तसे करू पण तूच योग्य आहेस हे मी त्याला समजावून सांगायचो. मात्र काही क्षण असे असतात जिथे कुणी पुढे येत नाही तिथे आपण नक्की पुढे व्हायचे असते. नांदेडमध्ये प्रकाश आंबेडकरांना पाडायला अशोक चव्हाण उभे राहिले होते. तेव्हा सर्व मैदाने आरक्षित करून सभाच होऊ देणार नाही अशी भूमिका घेतली गेली. त्यावेळी आम्ही सर्व शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते नगरपालिकेत गेल्यावर अधिकाऱ्याने नकार देत इंग्रजीत बोलायला सुरुवात केली तेव्हा मी त्याच्यासमोर दुप्पट इंग्रजी फाडले. "You tell me

and show me by objective evidence..” वगैरे वगैरे सगळे जड-जड शब्द वापरून मी त्याला विचारणा केली. अशावेळी इतरांना देखील लक्षात येते की हा व्यक्ती पुढे आहे तेच चांगले! ग्रामीण भागात मी पाहिले आहे की निरक्षर असून अतिशय हुशार आणि चांगले नेतृत्वगुण असणारे अनेक लोक आहेत. कसोटीच्या क्षणी धैर्य दाखवू शकला तरच तो खरा नेता! आप्पांच्या जन्मशताब्दीला मी आणि विनयराव हर्डीकर यांनीअभिवादन यात्रेची कल्पना काढली. अनेकजण म्हटले की अशी कशी अभिवादन यात्र काढणार? कसं शक्य होईल? अमुक होईल का? तमुक होईल का? आम्ही म्हणालो की प्रशालेचे विद्यार्थी फक्त रस्त्याने चालत गेले की काम झाले. मग सगळे तयार झाले. सुभाषराव आघाडीवर आले. घोषणा तयार झाल्या. “आप्पा पेंडसे ह्यांचे तत्त्व सर्व क्षेत्रात नेतृत्व!” अशा प्रकारच्या वेगवेगळया घोषणा बनवल्या. सर्व रस्ता आम्ही आधी चाललो, वेळ पाहिली, मार्ग ठरवला आणि अभिवादन यात्रा करायचे नक्की ठरले. शिवापूरहून कार्यकर्ते आले. दीनानाथ मधून काही कार्यकर्ते आले. आधीचे सगळे युवक सचिव शोधून काढले. प्रत्यक्ष नेतृत्व न करता देखील कुठे काय सुरू आहे हे सर्व मला माहित होते. ‘योजक: तत्र दुर्लभ:’ प्रमाणे अनेकदा आपल्याला योजक व्हावं लागतं. तिथे कच न खाणे हीच नेतृत्वाची खरी कसोटी असते!

**आदरणीय गुरुजन ...**

माझ्या ११वीमध्ये आ. वामनराव अभ्यंकरांनी सहामाहीमध्ये एकदा खूप अवघड प्रश्नपत्रिका काढली. आमच्या वर्गातील दोनच मुले ५० पेक्षा जास्त मार्क मिळवून पास झाली ती म्हणजे मी आणि विवेकानंद फडके. मग वामनराव आमच्या वर्गाची उजळणी घ्यायला लागले आणि मध्येच मला उभे करून सांगितले की आता वर्गाची उजळणी तू घे. त्यानंतर मी पुढचे ७-८ तास उजळणी घेतली. तेव्हापासून मी शिकवायला सुरुवात केली ते मी औद्योगिक क्षेत्रात आलो तरी लोकांना जिथे जाईन तिथे शिकवतच होतो.ह्यासगळया प्रवासात कुठली ‘युरेका मोमेंट’ आणि कुठला ‘झेनिथ पॉइंट’ मानावा असा प्रश्न पडतो. मी गिर्यारोहण देखील करतो. अन्नपूर्णा बेसकॅम्पला गेल्यावर जशी ३६० अंशात सर्वत्र शिखरे दिसतात तसे माझ्या आयुष्यात असे एकच अन्नपूर्णा शिखर शोधता येईल असे मला वाटत नाही. चालण्यासाठी पाय दोनच मात्र वाटा असंख्य आहेत. जिथे अजून कुणी पादाक्रांत केलेले क्षेत्र नाही अशा गोष्टींचा शोध घेत राहणे हे माझ्या बाबतीत कायम घडलेलं आहे.मी रिलायन्स सोडताना रघुनाथ माशेलकर संचालक मंडळावर आलेले होते आणि त्यांनी कल्पक प्रश्न लिहून पाठवां असे सांगितले होते. मी त्यात कार्बन उत्सर्जन संदर्भात काही कल्पनासुचवल्या होत्या. (मोटार वाहनातून निघणाराकार्बनडायऑक्साईडशोषून घेणे, आणि तो ग्रीन-हाउस मध्ये सोडणे यासाठीचे सयंत्र तयार करणे). रिलायन्स सोडल्यानंतर मी आठ दहा वर्षे दुसर्याग कंपनीत काम करून आता निवृत्ती घेतली आहे.याच ललत पंतप्रधान मोदींना देखील इलेक्ट्रिक गाड्यांसंदर्भात मी डिजिटल प्लॅटफॉर्मवर काही कल्पनापाठवल्या होत्या. (लिथियम सेल ऐवजी सोडियम सेल विकसित करणे – स्वस्ताई आणि उपलब्धतेसाठी)त्याचे उत्तर आले की सूचनेची नोंद केली आणि हा विषय बाद करण्यात आला आहे (Suggestion noted, matter closed) पुढे काय झाले माहित नाही. सध्या किसानपुत्र आंदोलनात मी रोज अभ्यास करून प्रत्येक सोमवारी एक लेख फेसबुकवर टाकत असतो. ‘अभ्यास देशस्थितीचा समतोल चालो’ हे कधी संपत नसते!काही समस्या ह्या भांडून


सोडवायला लागतात. रसायनशास्त्र शिकताना B.Sc.च्या पहिल्या वर्षाला पराडकरसर शिकवायला होते. त्यांनी M.Sc.कडे बघायचा दृष्टीकोनमला दिला. मला त्यांनी तेव्हाच सांगितले की M.Sc.किंवा Ph.D. हे तुझे काम नाही, तू तंत्रज्ञानाकडे जा. प्रबोधिनीमध्ये दहावी गणित शिकवणारे सत्यव्रत जोशी आजपर्यंत मला लाभलेले एक उत्तम गणिताचे शिक्षक होते. UDCT मध्ये अनेक चांगले शिक्षक लाभले. माझे अध्यापक प्राध्यापक एम. व्ही. जोशी देखील एक मोठे व्यक्तिमत्त्व होते. अशा अनेक गुरुतुल्य व्यक्ती लाभल्या. मात्र कुठलीही गोष्ट शिकायची असेल तर ती तुम्हालाच शिकावी लागते.

प्रबोधिनीत योगी अरविंदांचे वाक्य आपण ऐकलेले असते, 'काहीच शिकवता येत नसते, मात्र सर्व काही शिकता येते. शिक्षण हे अनुभवातून आणि प्रयोगातून पुढे जायला हवे.'विली रॅनहॅमर ह्यांनी मला automotive engineering मध्ये खूप मदत केली. माझे Ph.D. मार्गदर्शक व्ही. एन. नाडकर्णी हे मला लाभलेले चांगले गुरू होते. अशी अनेक नावे घेता येतील. आप्पा आणि आण्णा हे तर कायमच गुरुस्थानी राहतील. जरी त्यांचा सहवास संपला तरी निर्णय घेताना आण्णांनी हयाबद्दल काय निर्णय घेतला असता? आणि आप्पांनी काय कल्पक मार्ग शोधला असता? असा विचार दरवेळी मनात येतो. आजही सकाळी व्यायाम करताना, अनंतराव अभंग ह्यांनी शिकवलेले जोर मारत असताना 'हुप्पा-हुय्या जय बजरंगा' म्हणतो. रोजच्या चालण्यामध्ये 'विरजा मंत्र' मी म्हणत असतो. आपले सर्व मंत्र म्हणून मी त्यात स्वत:च्या मंत्राची भर घातलेली आहे.

**'ओम स्थिती, गती, मती, धृती, वृत्ती, नीती मे शुध्यंताम् '**

स्थिती म्हणजे भौतिक अवस्था, मती म्हणजे प्रज्ञा, धृती म्हणजे धैर्य, (आमचे गुरू नाडकर्णी ह्यांनी सांगितलेलं, "राजीव, Conviction is rare and rarer is the courage to conviction" त्यामुळे धैर्य तितकेच महत्त्वाचे) वृत्ती म्हणजे ॲटीट्यूड, उद्योग जगतात तुम्हाला बऱ्याचदा राजकारणामुळे नकारात्मक वृतीचा माणूस म्हणून वर्णन करतात. असं पहिल्यांदा माझ्या बाबतीत प्रबोधिनीमध्येच घडलं. दहावीमध्ये असताना मी नेहमी बंडखोर वृत्तीने वागतो म्हणून मला नकारात्मक ठरवलं गेलं. त्याच्याशी लढून मी पुन्हा बारावीमध्ये युवक विभागाच्या मुख्य प्रवाहाशी जोडला गेलो. अशा अनुभवातून मी मंत्राची भर घातली आहे.

सध्या मी मुंबईत स्थायिक आहे. कुटुंबात ज्यांना जे शिकायचे आहे ते-ते आवडीने शिकत आहेत. मी १९७६-८४ आणि २००१-११ मुंबईत काढलेली आहेत त्यामुळे इथेही माझे चांगले संपर्क आहेत. सध्या मी सर्वांना सांगितले आहे की मी सल्लागार, पाहुणा शिक्षक, मदतनीस वा मार्गदर्शक म्हणून काम करायला तयार आहे. जेव्हा मदत लागेल तेव्हा मी आजही महाविद्यालयात आणि कंपन्यांत मार्गदर्शन करत असतो. सध्या आता मी 'सृष्टीचे रसायन शास्त्र आणि पॉलिमर विज्ञान' असे मराठी पुस्तक लिहायला घेतले आहे. घरच्यांचे 'आर्ट-अपार्ट' नावाचे एंटरप्राइज आहे त्यातही मी थोडी मदत करतो.



**अन्नपूर्णा बेसकॅम्पवर राजीव बसर्गेकर, हेमंत पत्की आणि विनय टेंबे**

## Rapid Fire

१. आवडता चित्रपट – अनेक आहेत. त्यापैकी एक मनात आला तो 'चक दे इंडिया'

२. आवडते पुस्तक – 'दुर्दम्य' (टिळक चरित्र) – गंगाधर गाडगीळ

३. आवडता शेतीतज्ज्ञ किंवा उद्योजक – जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर, तो दोन्ही होता! अनेक उद्योगांची बीजे त्याच्या कामात होती.

४. पहिली प्रतिक्रिया

- शेतकरी– शोषण
- आप्पा पेंडसे – प्रतिभा
- शरद जोशी – अभ्यासू योद्धा

५. जर पुन्हा आयुष्य जगायची संधी मिळाली तर शिक्षका व्यतिरिक्त काय व्हायला आवडेल?

\- सध्या कुठल्या क्षेत्रात काम करतोय ह्याचा शोध अजून सुरू आहे त्यामुळे ह्या प्रश्नाचे काय उत्तर देणार? नव्याने काम करायचं म्हटलं तर रसायनशास्त्र समजून घेऊन शेतीमध्ये काम करायला आवडेल. शेतमालाची निर्मिती आणि त्याच्या उत्पादनातील रासायनिक प्रक्रियांचा अभ्यास मला करायचा आहे. नेहमी तंत्रज्ञान पुढे पळते आणि विज्ञान हे त्याच्या मागे धावते. 'know-how' आधी मग 'know why' येते. त्यामुळे शेतीतील 'know why' ओळखून त्यावर पुढे काम करायला नक्की आवडेल!

राजीव बसर्गेकर
+91 9322596646
rajeev.basargekar@gmail.com

**मुलाखत व शब्दांकन – श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**
**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**
Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org